**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २९ जून २०२४**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात ज्येष्ठांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत घोषणा.**
2. **राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत घेण्याबाबतच्या निकषामध्ये आणखी मुद्द्यांची भर घालण्यात येणार उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती.**
3. **नागपूरच्या धामणा कारखान्यातील स्फोट प्रकरणी मृत कामगारांच्या वारसांना अधिक मदत देण्याबाबत विचार करणार- कामगार मंत्री सुरेश खाडे यांची माहिती.**

**आणि**

4. **राष्ट्रीय चाचणी संस्थेकडून विविध प्रवेश परीक्षांच्या तारखा जाहीर, यूजीसी-नेट परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान होणार.**

*****

'मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र योजना'

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. या योजनेसाठी धोरण आणि नियमावली तयार करून ज्येष्ठांना शासनाच्या माध्यमातून तीर्थस्थळांच्या दर्शनासाठी नेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी य़ावेळी सांगितले.यासंदर्भात विधानसभा सदस्य प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला मुख्यमंत्री  उत्तर देत होते. आपला महाराष्ट्र संतांची भूमी असून दरवर्षी अनेक जण तीर्थस्थळांना भेटी देतात. ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन सुलभपणे होण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करून त्याची नियमावली केली जाईल. त्याअंतर्गत आवर्तन पद्धतीने, ऑनलाईन अर्ज मागवून ही योजना राबविण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

विधानसभा

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविण्याऱ्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार शासकीय नोकरी देण्याचा, त्यासाठीचे निकष निश्चित करण्याबाबतचा निर्णय नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचाविणारा कोणताही खेळाडू या निर्णयाच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी आवश्यकता असल्यास निकषांमध्ये आणखी मुद्द्यांची भर घालण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सदस्य हिरामन खोसकर यांच्याकडून खेळाडू कविता राऊत हिला उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हा उपअधीक्षक पदावर नोकरी देण्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यासंदर्भात माहिती दिली. राज्यातील सर्वसामान्य, वंचित-उपेक्षित, आर्थिक दुर्बल घटकांसाठी शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ वेळीच मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजनांसह सर्वच विशेष सहाय्याच्या योजनांचे पैसे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. दरम्यान, अर्थमंत्र्यांनी कालच विधिमंडळात अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन विधीमंडळाला हा अर्थसंकल्प मंजूर करण्याचा अधिकार आहे. त्यानंतर विनियोजन विधेयकाला राज्यपालांची मंजुरी मिळते. त्यानंतर अर्थसंकल्पातील निधी खर्च करण्यास मान्यता मिळते. शासन निर्णय काढता येतो. परंतु ही प्रक्रीया डावलून मंत्रीमडळाची बैठक घेऊन मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सरकारने शासन निर्णय काढला. हा सार्वभौम सदनाचा हक्कभंग आहे, असे विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना स्पष्ट केले.

परिषद

“भारतीय न्याय संहिता 2023”, “भारतीय साक्ष अधिनियम, 2023”, आणि “भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023” हे तीन नवीन फौजदारी कायदे 1 जुलै 2024 पासून देशभर लागू होणार आहेत. या कायद्यांची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाने एनएससीआय सभागृह, वरळी, मुंबई येथे उद्या रविवारी 30 जून रोजी “फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग” या विषयावर परिषदेचे आयोजन केले आहे.या परिषदेचे उद्घाटन

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कायदा व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या उपस्थितीत होणार आहे. या परिषदेला गुजरात, पंजाब, हरियाणा, राजस्थान, जम्मू-काश्मीर, लडाख येथील न्यायमूर्ती, विधी व न्याय मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात गुन्हेगारी प्रवृत्ती व गुन्हेगारीचे स्वरूप बदलत आहे त्याच पार्श्वभूमीवर जुने कायदे बदलून त्यांना नवीन कलमा अन्वये लागू करण्यात आले आहे. याबाबत अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी आज पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी या कायद्याच्या उपयुक्तेबद्दल सांगितले.

***आणि गुन्हे जे आहे ५११ होते पूर्वी आता ते ३५८ एकूण डिफाईन केलेले आहे. जे भारतीय न्याय संहितामध्ये आलेले आहे. त्याच्या सोबत भारतीय सुरक्षा संहिता आहे. जी CRPC होती ती आता त्याच्यामध्ये सेक्शन वाढ करण्यात आली आहे. आणि प्रोसीजर सोपी करण्यात आलेली आहे. याच्यामध्ये डिजिटल इव्हिडन्स आता जे आताच्या युवकांमधे, लोकांच्या हातामध्ये मोबाईल झालेला आहे. तांत्रिक टेकनॉलॉजी चा वापर होत आहे सर्वांकडे त्या सर्वाला कायद्यामध्ये यांचं रूप करण्यात आलेलं आहे. ज्याच्यामध्ये जे काही फॉरेन्सिक तपास आहे तो सुद्धा ग्राह्य धरण्यात येतो.***

येणाऱ्या काळात या कायद्यांची अंमलबजावणी व्हावी या करीता विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही रेड्डी यांनी सांगितल.

धामणा अपघात

नागपूर जिल्ह्यातील धामणा (तुरागोंदी) येथील चामुंडी एक्सप्लोसिव्हज या कंपनीत झालेल्या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्या नातेवाईकांच्या वारसांना संबंधित कंपनी व्यवस्थापनामार्फत २५ लाख आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून १० लाख रुपये अर्थसाह्य देण्यात आले आहे. याबाबत अधिक मदत देण्याबाबतच्या मागणीवर राज्य शासन निश्चित विचार करेल, अशी माहिती कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे यांनी आज विधानसभेत दिली. तसेच या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनधिकृत कारखान्याची विशेष तपासणी मोहीम राबविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आल्याची

माहितीही त्यांनी दिली. याबाबत, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. १३ जून २०२४ रोजी या कारखान्यात फटाक्यांच्या वातीचे पॅकिंगचे काम सुरु असताना आग लागली व स्फोट झाला. या घटनेमध्ये ९ कामगार गंभीररित्या भाजले. त्यापैकी ५ कामगारांचा घटनास्थळीच मृत्यू झाला व उर्वरित ४ जखमी कामगारांचा दवाखान्यात उपचारादरम्यान मृत्यू झाला. संबंधित कारखान्याच्या व्यवस्थापनाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून सध्या हा कारखाना बंद करण्यात आला असल्याची माहितीही खाडे यांनी दिली.

विधान परिषद

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी आज विरोधकांनी विधानपरिषदेत केली. गेलेअनेक दिवस विधानपरिषदेचं सभापतीपद रिक्त आहे हे संविधानाला धरून नाही असं सांगत शेकापचे जयंत पाटील यांनी आज कामकाज सुरू होताच हा मुद्दा उपस्थित केला. यावर सभापती पदाची निवडणूक घेण्यासंदर्भात विधीमंडळ सचिवालयानं केलेली कार्यवाही उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी निवेदनाच्या माध्यमातून सभागृहासमोर मांडली. ८ जुलै २०२२ पासून हे पद रिक्त आहे याबबद्दल राज्यपालांना कळवावं अशा आशयाचा पत्र व्यवहार संसदीय कार्य विभागासोबत केला होता, स्मरणपत्रही पाठवण्यात आलं होतं असं त्यांनी सांगितलं. यासंदर्भात येत्या सोमवारी सर्व पक्षीय आमदारांसोबत बैठक घेतली जाईल, असं संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

राष्ट्रिय सांख्यिकी दिन

नागपूरच्या सेमिनरी हिल्स स्थित एनएसएसओ राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण कार्यालयाच्या वतीने इंडियन सांख्यिकी दिवसानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून हिस्लॉप  महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ.हरिओम पुनयानी यांनी सांगितले की कोणत्याही निर्णय घेण्यापूर्वी माहितीचे संकलन करणे आवश्यक असते 'डेटा ड्रिव्हन डिसिजन मेकिंग' हे कुठल्याही व्यवसायाच्या यशस्वी संचालनाकरिता महत्त्वपूर्ण पार्श्वभूमी निर्माण करते. याप्रसंगी एनएसएसओ नागपूर कार्यालयाचे संचालक एल एम जडेजा यांनी तरुण पिढीने सांख्यिकी क्षेत्रात करिअर करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितलं. सांख्यिकी शास्त्रज्ञ प्रा.प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा जन्मदिन '२९ जून' दरवर्षी 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

युजीसी नेट फ़ेरपरिक्षा

नॅशनल टेस्टिंग एजन्सी - एनटीए नं रद्द केलेल्या आणि पुढे ढकललेल्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. एनटीएनं काल जाहीर केलेल्या अधिसूचनेत यूजीसी-नेट जून२०२४ ची परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान घेतली जाणार आहे. परीक्षेत गैरप्रकार झाल्याचं उघडकीस आल्यामुळे ही परीक्षा रद्द करण्यात आली होती. संयुक्त CSIR-UGC-NET परीक्षाही पुढे ढकलण्यात आली होती. ती आता २५ ते २७ जुलैदरम्यान घेण्यात येईल. एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम-ITEPमध्ये प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय सामाईक प्रवेश परीक्षा १०जुलै रोजी होणार आहे. अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षा२०२४ ही मूळ वेळापत्रकानुसार ६ जुलैला घेतली जाणार असल्याचं एनटीएनं सांगितलं.तसंच उमेदवारांनी अधिक माहितीसाठी www.nta.ac.in या संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्लाही एनटीएनं दिला आहे.

हवामान

हवामान: आज नागपुरात सकाळपासून ढगाळ वातावरण होतं. दुपारनंतर मात्र सर्वत्र मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. यामुळे वातावरणात थंडावा निर्माण झाला असून उकाडा कमी झाला आहे. आगामी तीन जुलै पर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्हयांमध्ये वीजांच्या कडकडाटासह वादळ आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. येत्या एका तासापूर्वी विदर्भातील सर्वच जिल्हयात विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचाही अंदाज आहे.

******